डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत सागरी जीवशास्त्रीय संशोधन केंद्राच्या पनवेल येथिल प्रक्षेत्रावर मत्स्यालय व संग्रहालय स्थापन करण्यात येणा-या बांधकामांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,
शासन निर्णय क्रमांक : कोकृवि-१११७/प्र. क्र. १४३ /७अे,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : २८ डिसेंबर, २०१७.

<u>संदर्भ</u> :- १) सशोधन संचालक, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांचे जा.क्र. डॉबासाकोकृवि/संशो-२/४८/२०१६,दिनांक ०४ जानेवारी,२०१६,

२) संशोधन संचालक, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांचे जा.क्र. डॉबासाकोकृवि/संशो-२/२७९६/२८१/२०१७, दिनांक १० जानेवारी,२०१७ चे पत्र,

३) नियोजन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : ससमा-२०१०/प्र.क्र.४८/का.१४६१, दिनांक ३० जानेवारी, २०१२.

<u>प्रस्तावना</u> :-

डॉ.बाळासाहेब सांवत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत सागरी जीवशास्त्रीय संशोधन केंद्राच्या पनवेल येथील प्रक्षेत्रावर मत्स्यालय व संग्रहालय स्थापन करण्याकरीता बांधकामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत संशोधन संचालक, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांनी संदर्भ क्रमांक १ - व २ च्या पत्रान्वये इमारत बांधकामाचे अंदाजपत्रक सादर केले आहे. त्यास अनुसरुन सागरी जीवशास्त्रीय संशोधन केंद्राच्या पनवेल येथील प्रक्षेत्रावर मत्स्यालय व संग्रहालय स्थापन करण्याकरीता बांधण्यात येणा-या इमारत बांधकामाच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची बाब शासनस्तरावर विचाराधीन होती. त्यानुसार शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय :-

डॉ.बाळासाहेब सांवत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत सागरी जीवशास्त्रीय संशोधन केंद्राच्या पनवेल येथील प्रक्षेत्रावर मत्स्यालय व संग्रहालय स्थापन करण्याकरीता नव्याने बांधण्यात येणा-या बांधकामाच्या अंदाजपत्रकास सार्वजनिक बांधकाम विभागाने मान्यता प्रदान केल्यानुसार सदर संशोधन केंद्राच्या बांधकामाकरीता एकूण रु. १,९९,७९,०४४/- (रुपये एक कोटी नव्याण्णव लाख एकोणऐंशी हजार चव्वेचाळीस फक्त) इतक्या निधीच्या प्रस्तावास शासन खालील अटींस अधिन राहून प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करीत आहे. (सविस्तर तपशिल परिशिष्ट “अ” मध्ये जोडला आहे.)

अ) सदर प्रस्तावास महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांची कार्योतर मंजूरी घेणे आवश्यक आहे.

ब) सदर कामाची सुरुवात सन २०१८-१९ या आर्थिक वर्षापासून करण्यांत यावी.

क) सदर कामांचा खर्च विद्यापीठाने त्यांचेकडील उपलब्ध निधीतून भागविण्यात यावा. कोणताही अतिरिक्त निधी उपलबध करुन देण्यांत येणार नाही.

ड) पाण्याच्या टाक्या व तत्सम बाबींचे दर योग्य असल्याची पुन:श्च खातर जमा करावी.

इ) काम सुरु करण्यापूर्वी नमुना नकाशा, मांडणी नकाशा तसेच विस्तृत नकाशास महाराष्ट्र शासनाच्या वास्तु विशारदांकडून मंजूरी वा सहमती घेऊन सुरु करावे.

ई) काम सुरु करण्यापूर्वी जागेच्या मालकी हक्का बाबतची पूर्तता करुन घ्यावी.

उ) ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतूदीबाबत काम करतेवेळी वस्तृत अंदाजपत्रके मंजूर करुनच काम हाती घ्यावे.

२. या बाबीकरीता येणारा खर्च डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाला " मागणी क्रमांक डी-३, २४१५ कृषि विषयक संशोधन व शिक्षण, ०१, पीक संवर्धन, १२०, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना, (००) (०७) डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाला सहायक अनुदान, ३१, सहायक अनुदान (वेतनेतर) (२४१५ ००८१)" या लेखाशीर्षाखाली अर्थसंकल्पीत केलेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

३. या प्रकरणी महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम १९८३, परिनियम १९९० आणि लेखासंहीता १९९१ मधील तरतूदींचा तसेच प्रचलित शासन आदेश / कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

४. हा शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्रमांक - ६५९ / इमारत - २, दिनांक २२/०९/२०१७ तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग - पाच अन्वये महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका अंतर्गत परिच्छेदांखालील प्रदान करण्यात आलेले वित्तीय अधिकार या शिर्षाखाली अ. क्र.१, महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परिच्छेद क्र.१३४ समोरील तरतूदीन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींनुसार त्या समोरील विहित अटीच्या अधिन राहून तसेच नियोजन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : ससमा-२०१०/प्र.क्र.४८/का.१४६१, दिनांक ३० जानेवारी, २०१२ मधील तरतुदीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१७१२२८१६०३२०३३०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Bharati Dinesh Dhuri

Digitally signed by Bharati Dinesh Dhuri
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ac65e55bc2f86ec37c6f25108b6605bc20e71b4742dd20d7e8f5e14cda6a2a7f, cn=Bharati Dinesh Dhuri
Date: 2017.12.28 16:07:50 +05'30'

(भारती दि.धुरी)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे,
२. सल्लागार (वित्त), महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे,
३. कुलगुरु, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली,
४. कुलसचिव, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली,
५. नियंत्रक, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली,
६. विद्यापीठ अभियंता, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली,
७. महालेखापाल, महाराष्ट्र १ / २ (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता) मुंबई / नागपूर,
८. जिल्हा कोषागार अधिकारी, दापोली जिल्हा - रत्नागिरी,

९. उपकोषागार अधिकारी, दापोली, जिल्हा - रत्नागिरी,
१०.मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई,
११.उप मुख्य लेखा परिक्षक (वरिष्ठ) स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई,
१२.जिल्हा लेखा परिक्षा अधिकारी, स्थानिक निधी लेखा, डॉ.बा.सा. को.कृषि विद्यापीठ, दापोली,
१३.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई /निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई,
१४.कार्यासन(१४३१), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
१५.कार्यासन (व्यय-१) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
१६.कार्यासन (इमारती-२), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
१७.कक्ष अधिकारी २अे / ६अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
१८.कार्यासन ७अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ (निवडनस्ती).

परिशिष्ट “अ”

(शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्रमांक : कोकृवि-१११७/प्र. क्र.१४३/७अे, दिनांक २८/१२/२०१७ सोबतचे परिशिष्ट)

डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत तारापोरवाला सागरी जीवशास्त्रीय संशोधन केंद्रच्या पनवेल येथील प्रक्षेत्रावर मत्स्यालय व संग्रहालय स्थापन करण्याकरिता येणा-या बांधकामाच्या खर्चाचा बाबनिहाय तपशिल.

अ.क्र.	कामाचे नांव	किंमत (रुपये)
१	इमारत बांधकाम (४८५.७६ चौ.मीटर) मत्स्यालय आणि संग्रहालयासाठी हॉल (६६ X ५० चौ.फुट) कार्यालय तसेच अधिकारी, कर्मचा-यांना बसण्यासाठी कक्ष प्रशिक्षण कार्यक्रम आयोजनासाठी स्वतंत्र कक्ष आणि प्रयोगशाळा इमारतीचे विद्युतीकरण (लाईटस, पंखे व इत्यादीसह) फर्नीचर व तत्सम साहित्य खरेदी.	रु. १,३१,०६,०४४/-
२	मत्स्यालय आणि संग्रहालयासाठी टाक्या, त्यांची मांडणी, सजावट, व्यवस्थापन इत्यादि. मत्स्यालय आणि संग्रहालयाचे एकूण ५ मुख्य विभाग (१) प्रवेशव्दाराजवळील टँकस, (२) गोडयापाण्यातील माशांच्या टँकस, (३) सिकलीड आणि प्लॅन्टेंड टँकस, (४) मरीन टँकस आणि (५) संग्रहालय. विविध आकाराच्या ५५ टाक्या संपूर्ण सेट - अपसह क्लॅडींग, थिम पेटींग, पार्टीशन इत्यादी संग्रहालयासाठी काचेची १४ कपाटे, मत्स्यालय व संग्रहालयात ठेवण्यासाठी विविध जातींचे,आकाराचे मासे व त्यांचे माहिती फलक मत्स्यालय व संग्रहालय व्यवस्थापन :- मासे, खाद्य, औषधे आणि रसायने, इंधन आणि वीज, ठेका पध्दतीने मनुष्यबळ, कार्यालयीन खर्च इत्यादी. मत्स्यालय आणि संग्रहालयासाठी लागणारे उपकरणे, फर्निचर, जनरेटर आणि किरकोळ खर्च.	रु. ६८,७३,०००/-
	एकूण (१+२)	**रु. १,९९,७९,०४४/-**